दिनांक २७/११/२०२०

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक सतीश रामनाथ गिरम, व्यवसाय - कंत्राटी संगणक ऑपरेटर ग्रुप ग्रामपंचायत लिंबेजळगांव, ता. गंगापुर, जि.औरंगाबाद यांनी १८,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी चे नांव हुद्दा | :- | सतीश रामनाथ गिरम, वय ३५ वर्षे, व्यवसाय कंत्राटी संगणक ऑपरेटर ग्रुप ग्रामपंचायत लिंबेजळगांव, ता. गंगापुर, जिल्हा औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे वाळुज, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.२४९/२०२० कलम ७ लाप्रका १९८८ अन्वये गुन्हा दाखल आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १८,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे प्लॉट मधील मिळकत चे नमुना ८ अ मध्ये दुरुस्ती करुन नवीन ८ अ चा उतारा मिळवुन देण्यासाठी म्हणून |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस स्टेशन वाळुज समोरील रोडवर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे प्लॉट मधील मिळकत क्रमांक ९५३ व ९५४ चे नमुना ८ अ च्या उता-यातुन गट नंबर काढुन नवीन दुरुस्ती चे ८ अ उतारा मिळवुन देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १८,०००/- रु सतीश गिरम, संगणक ऑपरेटर ग्रुप ग्रामपंचायत लिंबेजळगांव, ता.गंगापुर, जिल्हा औरंगाबाद हे लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, सतीश रामनाथ गिरम, कंत्राटी संगणक ऑपरेटर ग्रुप ग्रामपंचायत लिंबेजळगांव, ता.गंगापुर, जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे १८,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे काल दिनांक २६/११/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, सतीश रामनाथ गिरम, कंत्राटी संगणक ऑपरेटर ग्रुप ग्रामपंचायत लिंबेजळगांव, ता.गंगापुर, जिल्हा औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन १८,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी यांचे विरुद्ध पोलीस ठाणे वाळुज, औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.२४९/२०२० कलम ७ ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.संदीप राजपुत यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार सुनिल पाटील, अरुण उगले, रविंद्र अंबेकर, केवल घुसिंगे, चालक बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-1)** sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com